05 JUL 2026
पुढारी

# विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची १५ जुलै रोजी प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठीची प्रवेश परीक्षा बुधवारी (दि. १५)दुपारी ४ ते ५ या वेळेत मानव्यशास्त्र इमारत येथे घेण्यात येणार आहे, अशी माहिती समन्वयक डॉ. कविता वड्राळे यांनी दिली. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रवेश परीक्षा अर्ज ३० जूनपर्यंत मागविण्यात आले होते. ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा अर्ज केले आहेत, त्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा १५ जुलैला होणार आहे. अद्याप ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरलेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांनी १० जुलैपर्यंत प्रवेश अर्ज कार्यालयात आवश्यक कागदपत्रांसहित जमा करावेत. प्रवेश अर्ज केंद्राच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

056 JUL 2026

जनप्रवास

न्यूज शॉर्ट्स

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची १५ जुलै रोजी प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठीची प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे. प्रवेश परीक्षा अर्ज ३० जूनपर्यंत मागविण्यात आले होते. तरी ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा अर्ज केले आहेत, त्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा बुधवार, १५ जुलैरोजी दुपारी ४ ते ५ या वेळेत मानव्यशास्त्र इमारत येथे घेण्यात येणार आहे, असे समन्वयक डॉ. कविता वड्राळे यांनी कळविले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरलेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांनी १० जुलैपर्यंत प्रवेश अर्ज कार्यालयात आवश्यक कागदपत्रांसहित जमा करावेत. प्रवेश अर्ज केंद्राच्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

0 5 JUL 2026

सिंधुदुर्ग समाचार

# शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशासाठी 'स्क्रुटिनी सेंटर' सुरू

कोल्हापूर/प्रतिनिधी :

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थी व पालकांच्या सोयीसाठी शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी) येथे प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन व स्क्रुटिनी सेंटर (Scrutiny Centre) कार्यान्वित करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत (State CET Cell) राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज नोंदणी, कागदपत्र पडताळणी, अर्ज निश्चिती (Confirmation) तसेच प्रवेश प्रक्रियेबाबत संपूर्ण मार्गदर्शन या केंद्रामध्ये उपलब्ध करून दिले जात आहे.

महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशासाठी ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू केली असून, प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी निर्धारित मुदतीत अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून अर्ज निश्चित करणे अनिवार्य आहे. CAP तसेच संस्थास्तरावरील (Institute Level) प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी अर्जाची नोंदणी व पडताळणी आवश्यक असल्याने विद्यार्थ्यांनी अंतिम तारखेची प्रतीक्षा न करता प्रवेश प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या स्क्रुटिनी सेंटरमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. ऑनलाइन अर्ज भरणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, अर्जातील त्रुटी दूर करणे, दस्तऐवज पडताळणी, CAP प्रक्रियेतील विविध फेऱ्या (Rounds), पसंतीक्रम (Option Form) भरण्याची पद्धत, गुणवत्ता यादी (Merit List), महाविद्यालय निवड प्रक्रिया तसेच प्रवेश निश्चिती याविषयी प्रत्यक्ष मार्गदर्शन दिले जात आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या सर्व शंकांचे समाधान तज्ज्ञ प्राध्यापकांकडून केले जात आहे.

याशिवाय विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षणाचे स्वरूप, विविध शाखांची वैशिष्ट्ये, योग्य शाखा निवडीचे निकष, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) अंतर्गत झालेले बदल, भविष्यातील रोजगार संधी, उच्च शिक्षणाच्या संधी, स्टार्टअप व उद्योजकता, संशोधनाच्या संधी, विविध शिष्यवृत्ती योजना, शासनाच्या आर्थिक सहाय्य योजना तसेच शिवाजी विद्यापीठामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध विद्यार्थी कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात येत आहे.